# फडणवीस यांचा मनोज जरांगेंना धक्का




MO.9860898564

अन्याय, अत्याचार, भ्रष्टाचाराचा कर्दनकाळ

सायं.दैनिक महाराष्ट्र

# आरंभ

संपादक – दिपक थोरात

आरएनआय –एमएएचएमएआर/२०२३/८३९६५

RNI : MAHMAR/2023/83965

| बीड (महाराष्ट्र) | सायं.दैनिक | मराठी | वर्ष –०१ | अंक –७९ | शुक्रवार दि.०८ डिसेंबर २०२३ |
|---|---|---|---|---|---|
| Beed (Maharashtra) | Daily Evening | MARATHI | Year-01 | Issue -79 | FRIDAY DT.08 DECEMBER 2023 |




**मराठा आंदोलकांवरील गुन्हे सरसकट मागे घेण्यास ठाम नकार, सभागृहात सादर केले लेखी उत्तर**

नागपूर / प्रतिनिधी

राज्याचे उपमुख्यमंत्री तथा गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शुक्रवारी विधानसभेत जालन्याच्या आंतरवाली सराटीत पोलिसांनी केलेल्या लाठीचार्जवरील आपले लेखी उत्तर सादर केले. त्यांनी या घटनेसंबंधीचा संपूर्ण तपशील सादर करत कोणत्याही स्थितीत सरसकट गुन्हे मागे घेण्यास ठाम नकार दिला. या माध्यमातून फडणवीस यांनी मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटलांना जोरदार धक्का दिला आहे.

मराठा आरक्षणासाठी मनोज जरांगे पाटलांनी आंतरवाली सराटीत २९ ऑगस्टपासून बेमुदत उपोषण सुरू केले होते. त्यांनी मराठा समाजाला कुणबी प्रमाणपत्र देण्याची मागणी केली होती. पण पोलिसांनी त्यांच्या आंदोलनावर लाठीचार्ज केला आणि हे आंदोलनाचा वनवा पेटला. यामुळे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वातील राज्य सरकार बॅकफूटवर फेकले गेले. स्वतः राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना आंदोलकांची माफी मागावी लागली. या हिंसाचारानंतर जरांगेंच्या आंदोलनाला अधिकच धार आली.

देवेंद्र फडणवीस यांनी शुक्रवारी विधानसभेत या घटनेचा विस्तृत तपशील सादर केला. त्यात त्यांनी या प्रकरणी काही आंदोलकांवरील गुन्हे मागे घेण्यास ठाम नकार दिला. आंतरवाली सराटीत पोलिसांनी बचावात्मक व वाजवी पद्धतीने बळाचा वापर केला. या घटनेत जवळपास ५० आंदोलक व ७९ पोलिस जखमी झालेत. त्यामुळे सर्व बाबींची माहिती घेतल्यानंतर या प्रकरणी गुन्हे मागे घेण्याची प्रक्रिया सुरू केली जाईल, असे ते म्हणाले.

## मराठा आंदोलक – सरकारमध्ये होणार संघर्ष?

मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील यांनी आंतरवाली सराटीतील लाठीचार्जनंतर आंदोलकांवर दाखल झालेले गुन्हे सरसकट मागे घेण्याची सरकारला विनंती केली आहे. पण देवेंद्र फडणवीस यांनी असे कोणतेही सरसकट गुन्हे मागे घेणार नसल्याचे ठणकावून सांगितले आहे. यामुळे या मुद्यावरून पुन्हा एकदा मराठा आंदोलक व सरकारमध्ये मोठा संघर्ष होण्याची शक्यता निर्माण झाली आहे.

## कुठे – कुठे झाले होते आंदोलन?

मराठा आरक्षणाच्या आंदोलनाता पुणे शहर, सोलापूर शहर, कोल्हापूर, सांगली, अमळनेर, यवतमाळ, धाराशीव, नांदेड, परभणी, जालना, अहमदनगर या ठिकाणी शासकीय वाहनांवर दगडफेक, एसटी बसेसवर दगडफेक, घनसावंगी हद्दीत पंचायत समिती कार्यालय पेटवून देणे, तसेच विविध ठिकाणी जाळपोळ करून सार्वजनिक मालमत्तेचं नुकसान करण्याच्या घटना घडल्या आहेत, असेही देवेंद्र फडणवीस यांनी आपल्या उत्तरात सांगितले आहे.

# परप्रांतीय मुजरामुळे स्थानिक मजुरावर उपासमारीची वेळ!

बीड ।प्रतिनिधी

बीड जिल्ह्यात मोठ्या प्रमाणात परप्रांतीय मजूर तळ ठोकून आहेत विविध कारखाने हॉटेल लॉजिंग यासह विविध बांधकाम क्षेत्रात काम करणाऱ्या मोठ्या कामावर परप्रांचे मजूर असल्याने बऱ्याच प्रमाणत गुन्ह्यात वाढ होत असुन स्थानिक मुजराच्या पोटावर पाय पडत आहे.परप्रांतीय मजूर मिळेल त्या पैशांमध्ये काम करत असल्याने स्थानिक मुजरांच्या हक्काच्या मजुरीवर ही गदा येत आहे.विशेष म्हणजे पर प्रांतातून काही गुन्हेगार प्रवृत्तीचे नागरिक ही बीड शहरात तळ ठोकून असून त्यावर पोलिसाचा वचक नाही,पोलिसांनी बाहेर राज्यातील कामगाराची तपासणी केली नाही, यामध्ये बरेच कामगार हे बाहेर राज्यातून गुन्हे करून देखील आले असल्याची शक्यता नाकारता येत नाहीं.बरेचं बालकामगार देखील असण्याची शक्यता आहे .

बीड शहरात दोन दिवसापूर्वी एका बालिकेवर अत्याचार झाल्याचा प्रकार झाला असुन ते गुन्हेगार बाहेर राज्यातील आहेत,याआधी शहरात बरेचं गुन्हे हे बाहेर राज्यातील कामगारकडून झाले असुन त्यांची नोंद पोलिस ठाण्यात नसल्याने त्यांचा पत्ता,ठिकाण व गाव शोधण पोलिसांना कठीण आहे.त्यामुळे पोलिस अधीक्षकांनी सर्वच पोलीस ठाणे प्रमुखांना आदेश देऊन परप्रांतीयांची नोंद व गुन्हेगारी पार्श्वभूमी आहे का हे तपासले पाहिजे या सह ते किरयाने असतील तर त्या घरमालक,जागा मालक, गाळा मालकला समज देऊन त्याची सुद्धा नोंद पोलिस ठाण्यात करावी दोषी त्याची चौकशी केली पाहिजेया परप्रांतीय नागरिकांमुळे अनेक वेळा कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होत आहे.परप्रांतीय मुजरांची नोंदणी जिल्हा कामगार कल्याण विभागाकडे नसून संबंधित पोलीस ठाण्याच्या हद्दीत विविध ठिकाणी कामास असणाऱ्या मजुरांची कागदपत्रे ही दिली जात नसल्याने बीड शहरात गुन्हेगारी करत हे परप्रांतीय पळून जाण्यात यशस्वी होत आहे.परप्रांतीय मजुरांचे ओळखपत्र संबंधित पोलीस ठाण्यात कंत्राटदार व कारखानदार यांनी जमा करावे व त्यांना घर, जागा देताना व कामावर ठेवताना संबंधित घरमालकाने, व्यापाऱ्याने त्यांचे ओळखपत्र संबंधित पोलीस ठाण्यात जमा करणे आवश्यक बनले आहे. बीड शहरात टोळके चे टोळके आले आहेत त्यावर कोणाचं, पोलिसाचे लक्ष नसल्याने हे वाढत आहे व गुन्हेगार सुद्धा वाढ होत आहे.

शहरातील एमआयडीसी भागात फरसाण,पेढा,चिक्की सह छोट्या मोठ्या कारखान्यात कारखानदारांनी परप्रांतीय मजूर मोठ्या प्रमाणात कामास ठेवले आहे संबंधित मजुराकडून कमी दराने कामे केली जातात विशेष म्हणजे परप्रांती असल्याने त्यांचा मुक्कामी इथेच असतो मात्र थोडे पैसे वाचवण्यासाठी कारखानदार गुन्हेगारांना तर अभय देत नाहीत ना?असा प्रश्न निर्माण होत असून बीड शहरातील विविध हॉटेल्स लॉजिंग यासह, पियुपी काम,फारशी काम,काच काम,फर्निचर काम आधी कामावर मोठ्या प्रमाणात परप्रांती मजूर काम करत आहेत त्यमुळे स्थानिक करागरिवर उपासमार व कमी पैशात काम करण्याची वेळ आली आहे.त्यामुळे गुन्हेगारी मध्ये वाढ होत आहे.

## गुन्हेगारीत वाढ

हॉटेल,लॉजींग,बियर बार,एम.आय.डी.सी.भागातील कारखाने,काच काम,फारशी काम,पियुपी,फर्निचर सह इतर कामगार मोठ्या प्रमाणात बीडमध्ये तळ ठोकून!



पोलीस व जिल्हा कामगार नोंदणी कार्यालयाचे दुर्लक्ष



एक मोठी बातमी समोर आली आहे. तृणमूल काँग्रेसच्या खासदार महुआ मोईत्रा यांचं लोकसभा सदस्यत्व रद्द करण्यात आलं आहे.

## महुआ मोईत्रा यांची खासदारकी रद्द

## दिवसाढवळ्या दगडाने ठेचून तरुणाचा खून

**अंबाजोगाई : शहरातील छत्रपती शिवाजी महाराज चौकापासून जवळ मोंढा रोडवर एका तरुणाचा दगडाने ठेचून खून करण्यात आल्याची घटना आज शुक्रवारी (दि.०८) सकाळी ११ वाजताच्या सुमारास घडली.**

राजेंद्र श्रीराम कळसे (वय ३७, रा. महसूल कॉलनी, अंबाजोगाई) असे मृत तरुणाचे नाव आहे. पोलीस सूत्रांनी दिलेल्या प्राथमिक माहितीनुसार अज्ञात हल्लेखोरांनी दगड आणि लाकडी दांडक्याने राजेंद्र यांच्यावर जोरदार हल्ला चढविला. या हल्ल्यात राजेंद्र यांचा जागेवर मृत्यू झाला. भरदिवसा अत्यंत वर्दळीच्या ठिकाणी रोडवर घडलेल्या या घटनेमुळे शहरात खळबळ उडाली आहे. दरम्यान, हा खून कोणत्या कारणास्तव झाला हे अद्याप स्पष्ट झाले नसून यामागे जागेच्या वादाचे कारण असल्याची शक्यता वर्तविण्यात येत आहे.

## ढगाळ वातावरणामुळे हरभ-यावर घाटेआळीचा प्रादुर्भाव

**किटकनाशके फवारणी औषधाचा परिणाम नसल्याने पाळी घालण्याची वेळ:– डॉ.गणेश ढवळे**

लिंबागणेश ।प्रतिनिधी

गेल्या तीन दिवसांपासून वातावरणात अचानक बदल झाल्याने पहाटे धुक्याची चादर पसरत असुन दुष्काळी परिस्थितीत आधीच आर्थिक संकटात सापडलेल्या शेतकऱ्यांना हरभ–यावरील घाटे आळीच्या प्रादुर्भावामुळे हातचे पिक गले असुन पाळी घालण्याची वेळ आली असुन शेतकरी दुहेरी संकटात सापडला आहे.मात्र जाहिरात बाजीत मस्त असलेल्या कृषीविभागाला



याचे गांभीर्य नसुन बांधावर न जाताच फुकटचे सल्ले देत असल्याने शेतकऱ्यांमध्ये तिव्र संतापाची भावना आहे.पंचनामे करू तातडीने मदत करण्यात यावी अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर यांनी जिल्हा प्रशासनाला केली आहे.गेल्या ३–४ दिवसात ढगाळ वातावरण आणि धुक्याने पेरलेल्या ५ एकर हरभरा पिकांवर घाटेआळीचा रोग पडला असुन रोजचा फवारणीचा खर्च परवडेना झाला आहे.एकरी १० हजार रुपये खर्च करताना दोन –अडीच लाख रुपये पदरात पडण्याची अपेक्षा होती परंतु या घाटे आळीमुळे पिक वाया गेल्याने आता पाळी घालण्याची वेळ आली आहे.कृषीविभागाचे अधिकारी, कर्मचारी पंचनामा करायलाच येत नाहीत तर नुकसान भरपाईचा विषयच लांब राहीला.

# सौर प्रकल्पाला विरोधाचे ग्रहण !

## ■ डॉ.कराडांच्या ड्रीम ला स्थगिती येणार?

परमेश्वर घुंगासे । पैठण

जायकवाडी जलाशयावर केंद्रीय मंत्री डॉ.भागवत कराड यांचा ड्रीम प्रोजेक्ट समजल्या जाणाऱ्या तरंगता सौर ऊर्जा प्रकल्प सध्या चांगलाच विरोधाच्या भोवऱ्यात सापडल्याचे दिसून येत आहे, पर्यावरण प्रेमी आणि स्थानिक मच्छीमार यांच्या कडून या प्रकल्पाला कडाडून विरोध केला जात आहे. कित्येक वर्षापासून डॉ.भागवत कराड हे या प्रकल्पासाठी व्यक्तिगत आग्रही होते. पुढाकारची भूमिका घेत प्रत्यक्ष त्यांनी केंद्र आणि राज्य शासनाकडे पाठपुरावा केला त्याच पाठपुराव्याच्या अनुषंगाने प्रकल्पाचे कार्य सुरू होण्याच्या उंबरठ्यावर असताना आत्ता या प्रकल्पाला सामजिक आणि कायदेशीर विरोधांना तोंड द्यावे लागणार हे जवळपास निश्चित आहे.मात्र या होणाऱ्या विरोधावर केंद्रीय मंत्री भागवत कराड किंव्हा कोणत्याही शासकीय शिष्टमंडळाने अधिकृत भाष्य करण्याचे टाळले आहे. असे असले तरी आता मात्र स्थानिक मच्छीमारांनी



चांगलाच आक्रमक पवित्रा घेतल्याचे चित्र आहे दि. सात डिसेंबर पासून पैठण आणि नेवासा या ठिकाणी स्थानिक मच्छीमार आणि पर्यावरण प्रेमी संयुक्त पणे ब बेमुदत सामूहिक उपोषणावर बसले आहेत.या पूर्वी राज्याचे उमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी ३० नोव्हेंबर रोजी याच प्रकल्पा संदर्भात मुंबई येथे एक बैठक बोलावून त्यात एन.टी.पी.सी.अर्थात (नॅशनल थर्मल पॉवर कॉर्पोरेशन) या कंपनी सोबत शासनाचा करार, पर्यावरणासंबंधी परिसराचे सर्वेक्षण करण्यासाठी एजेंसी नेमणे आणि स्थानिक पातळीवरील अडचणी सोडविण्या संदर्भातील विषय या बैठकीत उपस्थित करण्यात आले होते.मात्र या पूर्वीपासूनच विविध स्तरातून या प्रकल्पाला विरोध होताना दिसून होता या प्रकल्पाच्या विरोधात पैठण तहसील कार्यालयावर शेकडो नागरिकांनी भव्य मोर्चा काढून प्रखर विरोध दर्शवला होता, शासकीय स्तरारून या मोर्चाला नीरस प्रतिसाद मिळाला म्हणून आज घडीला या समाज बांधवांनी आक्रमक पवित्रा घेतल्याचे सांगण्यात आले.जायकवाडी जलाशयात स्थानिक मच्छीमार उदरनिर्वाह करीत असतात, तब्बल बावीस हजार मच्छीमारांचे उदरनिर्वाह याच जलाशयावर अवलंबून असून हे मच्छीमार कायद्याची अंमलबजावणी करुन निर्धारीत केल्याप्रमाणे मासेमारी करीत असतात तसेच, दरवर्षी, निसर्गाचे संतुलन राहावे म्हणून कोट्यावधी मत्सबीज शासनाच्या परवानगीने या तलावात सोडत असतात. अशावेळी वीस बावीस हजार कुटुंबाच्या उपासमारीची वेळ या नाहक प्रकल्पामुळे येणार असल्याचे दिसून येते.वीज निर्मिती करायचीच असेल तर, सध्या पैठण येथील वीज निर्मितीकेंद्र जे १२ मेगावेट वीजनिर्मिती करते त्याचे अत्याधुनिकरण करुन अधिकची वीज तिथे तयार करता येते त्यासाठी जलाशयावर तरंगता सौर ऊर्जा प्रकल्प झालाच पाहिजे असा हट्ट करु नये, असे मच्छीमार, पक्षीप्रेमी, निसर्गप्रेमी आणि पर्यटनप्रेमी बांधवांचे मत आहे.

## जरांगे पाटलांना पाठिंबा देण्यासाठी बीडमध्ये ज्येष्ठांचे उपोषण



मराठा समाजाला ओबीसीमधून सरसकट कुणबी प्रमाणपत्र देण्यात यावे या मागणीसाठी मनोज जरांगे पाटील गेल्या अनेक दिवसांपासून आंदोलन करत आहेत. त्यांच्या आंदोलनाला पाठिंबा देण्यासाठी आज बीड शहरातील ज्येष्ठ नागरीकांनी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर एक दिवसाचे लाक्षणिक उपोषण केले. या वेळी कोणत्याही समाज घटकावर अन्याय न होता मराठा समाजाला सरसकट प्रमाणपत्र देण्यात यावे, अशा आशयाच्या मागणीचे निवेदन जिल्हाधिकार्यांना देण्यात आले.मराठा समाजाला आरक्षण मिळावे यासाठी गेल्या कित्येक वर्षांपासून आंदोलने होत आहेत. गेल्या तीन महिन्यांपूर्वी मनोज जरांगे पाटील यांनी उपोषण सुरू केले. या दरम्यान पोलिसांचा लाठीमार झाला. त्यानंतर हे आंदोलन अधिक तीव्र होत असून मनोज जरांगे पाटील यांचे आरक्षणविषयी जनजागरण हेतू राज्यात संपर्क दौरे सुरू आहेत. मराठा समाजातील आर्थिक, सामाजिक आणि शैक्षणिक मागासपण दूर करण्यासाठी आरक्षण अधिक महत्वाचे आहे.

### अॅड.मनोज संकाये मित्रमंडळाच्या वतीने

# महापरिनिर्वाण दिनी डॉ.बाबासाहेब आंबेडकरांना केले आभिवादन!

परळी ।प्रतिनिधी

भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार, महामानव डॉ.बाबासाहेब आंबेकर यांचा आज महापरिनिर्वाण दीन आहे त्यानिमित्ताने अॅड.मनोज संकाये मित्रमंडळाच्यावतीने परळीतील रेल्वे स्टेशन येथील डॉ . बाबासाहेब आंबेडकरांच्या पूर्णाकृती पुतळ्याला हार अर्पण करून अभिवादन केले.

डॉ.बाबासाहेब आंबेडकरांमुळेच या देशांमध्ये लोकशाही नांदत आहे. वेगवेगळ्या जाती धर्माची लोक या देशात भारतीय राज्यघटनेमुळेच नांदत आहेत आणि म्हणूनच भारत हा विविधतेतून नटलेला देश म्हणून साऱ्या जगाला परिचित आहे ते फक्त संविधानामुळे शक्य झाले असून आपण सर्वांनी महामानव घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारांची मशाल तेवत ठेवली पाहिजे असे मत त्यांनी व्यक्त केले.यावेळी मकरंद



नरवणे, वैजनाथ केंद्रे ,प्रवीण रोडे, सुंदर आव्हाड, संतोष कांबळे, राम गडदे, लहू हलगे, मुन्ना चव्हाण, जयसिंग रोडे आदिसह मित्र मंडळाचे पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# गाथा मुक्ती संग्रामाची-गुणगान शाहीर अनंत मुंडे यांनी शासन आपल्या दारी कार्यक्रमात सादर केला पोवाडा

### जिल्हाधिकारी दीपा मुधोळ यांच्या प्रेरणेने व शिक्षक बंडू अघाव यांच्या मार्गदर्शनाखाली पोवाड्याची निर्मिती

परळी ।प्रतिनिधी

महाराष्ट्र शासनाच्या वतीने परळी वैजनाथ येथे मंगळवार (दि.५) नोव्हेंबर रोजी राज्याचे मुख्यमंत्री माननीय एकनाथरावजी शिंदे साहेब, उपमुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस साहेब, उपमुख्यमंत्री अजित दादा पवार साहेब, पालकमंत्री धनंजयजी मुंडे साहेब,लोकनेत्या पंकजाताई मुंडे यांच्या उपस्थितीत संपन्न झालेल्या शासन आपल्या दारी या अभूतपूर्व,अविस्मरणीय कार्यक्रमातील विशाल जनसमुदायासमोर आपल्या परळीतील सुप्रसिद्ध शाहीर अनंत मुंडे यांनी बीड जिल्ह्याच्या कर्तव्यदक्ष व कार्यकुशल जिल्हाधिकारी दीपाताई मुधोळ-मुंडे यांच्या संकल्पनेने व शिक्षक नेते बंडू अघाव यांच्या मार्गदर्शनाखाली तयार केलेला मराठवाडा मुक्ती संग्रामावर तयार केलेला व मराठवाड्याच्या भुमीचे गुणगान गाणारा गाथा मुक्ती संग्रामाची-गुणगान मराठवाड्याचे* हा पोवाडा सादर केला. त्यांना कोरस म्हणून प्रा. संजय आघाव,सिद्धेश्वर इंगोले , बालाजी कांबळे, तृप्ती तंवर,ज्ञानेश्वरी चौरे आणि अपर्णा ओपळे यांनी साथ दिली.

शासन आपल्या दारी या भव्यदिव्य



कार्यक्रमात हा पोवाडा सादरीकरणासाठी राष्ट्रवादी काँग्रेसचे जेष्ठ नेते वाल्मिकआण्णा कराड,भाऊसाहेब (भाऊड्या) कराड, शिक्षक नेते शाम(बापू)अघाव, बंडू अघाव यांचे विशेष सहकार्य लाभले. हा पोवाडा ऐकून श्रोते मंत्रमुग्ध झाले.

## कै.तुकाराम खरात यांच्या गंगा पूजना निमित्त ह.भ.प.गजानन महाराज गोंदीकर यांच्या कीर्तना चे आयोजन

गेवराई ।प्रतिनिधी

गेवराई शहरातील भगवान नगर येथील रहिवासी विमा प्रतिनिधी अविनाश खरात यांचे वडील तुकाराम विठ्ठलराव खरात यांचे २९ नोव्हेंबर २०२३ रोजी अल्पशा आजाराने दुःखद निधन झाले होते.त्यांचा अंत्यविधी चिंतेश्वर स्मशानभूमी येथे पार पडला होता. त्यांचा दशक्रिया विधी कार्यक्रम आज ८ डिसेंबर शुक्रवार रोजी त्यांचे मूळ गाव असलेल्या पाथरवला बू.येथे होणार असून त्यांचा तेराव्या चा कार्यक्रम ११ डिसेंबर रोजी असून १२ डिसेंबर मंगळवार रोजी गंगा पूजनाचा कार्यक्रम असून त्या निमित्त सकाळी ९ ते १२ यावेळेत ह.भ.प.गजानन महाराज गोंदीकर यांच्या कीर्तनाचे आयोजन त्यांच्या भगवान नगर येथे करण्यात आले असुन या कीर्तनाचा लाभ घ्यावा असे आवाहन अण्णासाहेब तुकाराम खरात, भाऊसाहेब तुकाराम खरात, अविनाश तुकाराम खरात गं.भा.सुनीता वसंतराव देशमुख यांनी केले आहे.



माजलगाव ।प्रतिनिधी

माजलगाव येथील एच.पी.गॅस एजन्सी परभणी रोड येथील एजन्सी कडुन घरगुती गॅस शहरामध्ये गल्लो गल्ली तास न तास थांबून विकले जात आहेत व गॅसचे वजन न करताच गॅसची टाकी ग्राहकांना विक्री केली जात आहे यामुळे ग्राहकांची लुट होतांना दिसुन येते. माजलगाव येथील परभणी रोडवर असलेली एच पी गॅस एजन्सी कडून घरगुती गॅस घरपोज करण्या ऐवजी शहरामधील काही गल्ली बोळा मध्ये थांबून तास न तास गाड्या थांबवत गॅस विक्री करत आहेत त्याचप्रमाणे गॅस ग्राहकांना कुठलंही वजन करून दिले जात नाही या प्रकारामुळे एखादया गल्लीमध्ये अधिक वेळ थांबून गॅस विक्री करत असताना गॅस हा विस्फोटक पदार्थ असल्याने स्पोंट होऊन नागरिकांची जीवित हानी होऊ शकते अशी घटना घडल्यास शासनाने जागे होण्या अगोदरच योग्य ती कारवाई करून संबंधित गॅस एजन्सी चालकाला सूचना कराव्यात व योग्य ती कारवाई करावी गॅस एजन्सी धारकांना कुठलीही लूट होऊ नये त्याचप्रमाणे गॅस विकत असताना त्याचं वजन करून देण्यात यावे व गॅस विकताना तास दोन तास थांबून न विकता त्याला शासनाने घालून दिलेले नियम पाळत नसल्याने योग्य ती कार्यांवाही करण्यात यावी अन्यथा तहसील कार्यालयासमोर लोकशाही मार्गाने आमरण उपोषण करण्यात येईलअशी मागणी माजलगाव तालुका पुरवठा अधिकारी यांच्याकडे शेख हमीद यांनी केली आहे.

माजलगाव तहसीलदारमॅडम यांनी संबंधित गॅस वितरकांना एजन्सी धारकांना सूचना केल्या होत्या की शहरांमध्ये गल्ली बोळामध्ये कुठेही थांबून गॅस विक्री करू नये

# सरकारी शाळेत भौतिक सुविधांचा अभावामुळे खाजगी शाळेत विज्ञान प्रदर्शन ?

### शहरातील खाजगी विद्यालयात विज्ञान प्रदर्शनाचे उद्घाटन ; तालुक्यातील शाळांचा मोठया प्रमाणावर सहभाग !

शिरूर कासार ।प्रतिनिधी

शहरातील एका खाजगी विद्यालयात दोन दिवसीय तालुकास्तरीय विज्ञान प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले होते त्याचा लाभ घेण्याचे आवाहन गटशिक्षणाधिकारी कार्यालय,पंचायत समिती एका विद्यालयाच्या संयुक्त विद्यमाने एकावन्नव्या तालुकास्तरीय विज्ञान,गणित आणि पर्यावरण या विषयांचे प्रदर्शन तीन ते पाच डिसेंबर या कालावधीत पार पडणार असल्याचे सांगण्यात आल्या प्रमाणे प्रदर्शन पारही पडले त्यांचे सोमवारी विज्ञान प्रदर्शनाचे उद्घाटन झाले व मंगळवारी बक्षीस वितरण करण्यात आले तसेच या प्रदर्शनाचा लाभ घेण्याचे आवाहन गटशिक्षणाधिकारी जमीर शेख यांच्यासह विस्तार अधिकारी नारायण मुरूमकर, विद्यालयाचे प्राचार्य निलेश पोकळे यांनी केले होते. हे विज्ञान प्रदर्शन पार पडल्या पासून शहरात चर्चेला उधाण आले आहे.

शिरूर शहरातील जिल्हा परिषद माध्यमिक शाळेची पटसंख्या ही घटक चालली असून शासनाचे योजनेचे विविध उपक्रम हे जिल्हा परिषद माध्यमिक शाळेतच राबवायला हवे त्यामुळे शाळेची पटसंख्या वाढण्यास मदत होईल तसेच हे खाजगी शाळेत घेण्यात आलेले विज्ञान प्रदर्शन हे देखील जिल्हा परिषद शाळेतच व्हायला हवे होते असे आशिफ शेख अध्यक्ष शालेय व्यवस्थापन समिती यांनी सांगितले.तसेच आजी - माजी गाव पुढारी यांच्या राजकारणामुळे विद्यार्थ्यांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान होत चालले आहे.त्यामुळे गाव पुढारी यांनी ज्ञान मंदिरात राजकारण न करता गोरगरिबांच्या मुलांसाठी विविध योजना कशा प्रकारे राबवता येतील व त्याचा लाभ गरिबांच्या मुलांना कसा होईल याचे राजकारण करायला हवे असे सुज्ञ नागरिक बोलत असुन शिरूर शहरात जिल्हा परिषद माध्यमिक शाळेची सुमारे पाच कोटी रुपयांची भव्य अशी इमारत बांधण्यात आली असुन देखील गटशिक्षणाधिकारी जमीर शेख यांनी शासकीय शाळा सोडून खाजगी शाळेत विज्ञान प्रदर्शन का आयोजित केले ? या मागे त्यांचा काय हेतु आहे ? हि शाळा बंद तर करायची नाही ना ? असा प्रश्न सुज्ञ पालकांना पडला असुनहे गुलदस्त्यात आहे. त्यामुळे शहरात चर्चा रंगली असुन यावर जिल्हा शिक्षणाधिकारी नागनाथ शिंदे साहेब काय भुमिका घेतील हे पहावयास मिळणार आहे.

सलग दोन वर्ष एकाच शाळेवर विज्ञान प्रदर्शन घेणं चुकीचं आहे. सदरील योजना या शासकीय शाळेतच राबवायला पाहिजेत तरी या सर्व विषयावर गटशिक्षणाधिकारी यांच्याशी बोलून चर्चा केली जाईल असे जिल्हा शिक्षणाधिकारी नागनाथ शिंदे यांनी सांगितले.

विज्ञान प्रदर्शनाच्या विषयावर आमची अगोदर बैठक झाली असून विज्ञान प्रदर्शन साठी कसल्याही प्रकारे अनुदान मिळत नसते त्यामुळे आम्ही इतर शाळेत अशा प्रकारे उपक्रम घेत असल्याचे गटशिक्षण अधिकारी जमीर शेख यांनी सांगितले.

सरकारी शाळेत भौतिक सुविधांचा अभाव त्याचमुळे खाजगी शाळेचा आधार घ्यावा लागत असल्याचे दिसत आहे. एकीकडे खाजगी शाळेत भौतिक सुविधा मिळत आहे ही खूप चागली बाब असून त्याचा विद्यार्थ्यांना लाभ होत आहे परंतु सरकारी शिक्षणाधिकारी मात्र एक प्रकारे आपली जबाबदारी झटकत असल्याचे दिसून येत आहे यात आर्थिक व मानसिक उदासीनता दिसून येत आहे परंतु सरकारी शाळेत विद्यार्थ्यांच्या प्रती आस्था दिसून येत नाही. ही खंत अनेक पालकांनी नाव न छापण्याच्या अटीवर सांगितले आहे .



## मराठवाड्यातील शेतकऱ्यांसाठी जायकवाडी जलाशयातुन डाव्या कालव्याद्वारे पाच आवर्तन द्यावे शिवसेना सहसंपर्कप्रमुख डॉ.हिकमत दादा उढाण यांनी निवेदनाद्वारे मागणी केली आहे.!

जायकवाडी धरणातुन डाव्या कालव्याद्वारे दोन आवर्तन देण्याचे पाठबंधारे विभागाकडून निश्चित करण्यात आले आहे. परंतु उन्हाळ्यामध्ये फळबाग व अन्य पिकांचे पाण्याअभावी नुकसान होऊ नये म्हणुन व उन्हाळ्यात जनावरांच्या पिण्याच्या पाण्याचा प्रश्न गंभीर रुप धारण करु शकतो त्यामुळे शेतकऱ्यांच्या व जनावरांच्या हिताच्या दृष्टीने डाव्या कालव्यातुन रब्बीचे २ व उन्हाळी ३ असे एकुण पाच आवर्तने सोडण्याची आवश्यकता आहे.

अशी मागणी शिवसेना सहसंपर्कप्रमुख डॉ.हिकमत दादा उढाण यांनी मुख्य अभियंता लाभक्षेत्र विकास छत्रपती संभाजीनगर यांना निवेदन देउन केली आहे..त्यावेळी शिवसेना तालुकाप्रमुख उद्धव मरकड, पंचायत समिती गटनेते अनिरुद्ध शिंदे,सरपंच अनिल सानप,रामजी मोहीते उपस्थित होते.



इचलकरंजी ।प्रतिनिधी

महानगरपालिकेच्या वतीने बुधवार दि. ६ डिसेंबर रोजी भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार, महामानव , भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त स्टेशन रोडवरील डॉ.आंबेडकर यांच्या पुर्णाकृती पुतळ्यास तसेच डॉ. बाबासाहेब आंबेडकर हॉस्पिटलजवळील अर्ध पुतळ्यास आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर हॉस्पिटलमधील प्रतिमेस आयुक्त तथा प्रशासक ओमप्रकाश दिवटे यांच्या हस्ते आणि उपायुक्त डॉ. प्रदीप ठेंगल आणि सोमनाथ आढाव यांच्या प्रमुख उपस्थितीत पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.

## काढणे गावांमध्ये कोणतेही डेंगूचे पेशंट नसल्याचे स्पष्ट

# विरोधकांनी केलेले आरोप बिनबुडाचे :सरपंच सूरज चक्के

पाटण तालुक्यातील काढणे या गावांमध्ये डेंगूचे पेशंट एक ही नाहीत अशी माहिती काढणे गावचे सुरज शंकर चक्के (सरपंच)

निलेश वसंतराव पाटील ( उपसरपंच) यांनी पत्रकारांनशी बोलताना दिली.तसेच ग्रामपंचायतने गावा मध्ये अळीनाशक फवारणी केल्यामुळे त्या गावांमध्ये आरोग्याचा प्रश्न कोणता ही निर्माण झाला नसल्याचे स्पष्ट झाले आहे, असे गावचे सरपंच यांनी सांगितले आहे.पण काही लोक गावाचं नाव बदनाम करण्याचा हेतूने चुकीची माहिती देत आहेत .काढणे गावामध्ये डेंगूचा फैलाव वाढण्याची कोणतीही भीती निर्माण झालेली नाही. पेस्ट कंट्रोल ठेवण्याकडे झालेले ग्रामपंचायत चे लक्ष असून अळीनाशक धूर फवारणी केलेली आहे. आरोग्य विभागानेही घरोघरी जाऊन तपासणी केली आहे.मनोज पाटील यांनी केलेले आरोप बिनबुडाचे असल्याचे गावचे सरपंच व उपसरपंच यांनी सांगितले आहे .काढणे गावामध्ये डेंगूचे पेशंट एकही नसल्याचे स्पष्ट झाले आहे ,पण काही लोक गावचे नाव बदनाम करण्याचे हेतूने चुकीची माहिती देत आहेत.



# बळीराजाच्या आनंदावर विरजण !

## ऊसा पासून इथेनॉलची निर्मिती करण्यावर बंदी

केंद्र सरकारने एक मोठी घोषणा करत ऊसाच्या रसापासून तयार केल्या जाणाऱ्या इथेनॉलवर बंदी घातली आहे. केंद्र सरकारने यासंबंधीचं नोटिफिकेशन जारी केलं आहे. यामुळे घरगुती बाजारपेठेतील साखरेचा तुटवडा पूर्ण होईल. सरकार बी-हेवी मोलॅसिसपासून इथेनॉल तयार करणाऱ्यांना रोखू शकतं. सी-हेवी इथेनॉलवर बंदी नाही. सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, आज (८ डिसेंबर) दिवसाअखेरीस यासंबंधी अंतिम निर्णय घेतला जाऊ शकतो.

पण असं का?

पावसामुळे भारतातील ऊसाच्या पिकांचं मोठं नुकसान झालं आहे. यामुळे जगातील सर्वाधिक साखरेचं उत्पादन करणाऱ्या देशांच्या यादीत दुसऱ्या क्रमांकावर असणाऱ्या भारताने ३१ ऑक्टोबरपर्यंत निर्यातीवर बंदी घातली आहे. इथेनॉलची निर्मिती मर्यादित केल्यास साखरेचा साठा कमी होणार नाही.

जर इथेनॉलची निर्मिती कायम राहिली तर



साखरेचा तुटवडा निर्माण होऊ शकतो. २०२३-२४ मध्ये उत्पादन कमी झाल्याने आधीच चिंता वाढली आहे. महाराष्ट्रात तर २०२४-२५ ची शेतीही सुरु झालेली नाही. महाराष्ट्रात रिझर्व्ह आयरमध्ये कमी पाणी आल्याने शेतीवर परिणाम झाला आहे. गेल्या वर्षीच्या तुलनेत साखरेच्या उत्पादनात ८ टक्के घट झाल्याचा अंदाज आहे. २०२३-२४ साठी ३३७ लाख टन साखरेचे उत्पादन होण्याचा अंदाज आहे. ३०-३५ लाख टन साखरेइतकाच ऊस इथेनॉलसाठी वापरला जातो.

सध्या परिस्थिती काय आहे?

साखर कंपन्यांनी इथेनॉलचा पुरवठा करण्यासाठी तेल कंपन्यांसह करार केला आहे. १ नोव्हेंबरपासून सुरु होत असलेल्या हंगामासाठी ३१.७ लाख टन साखरेइतक्या इथेनॉलचा लिलाव झाला आहे. १ नोव्हेंबरपासून सुरु होणाऱ्या हंगामासाठी अद्याप इथेनॉलचा दर ठरलेला नाही.

सरकारकडे दोन पर्याय

सरकारकडे सध्या दोन पर्याय आहेत. ज्यामध्ये इथेनॉलचा दर कमी करणं किंवा साखर कंपन्या जास्त इथेनॉल पुरवठा करू शकणार नाहीत. महागाईवर गृहमंत्री अमित शाह यांच्या नेतृत्वाखाली दर आठवड्याला मंत्रिगटाची बैठक घेतली जाते. हा निर्णय मंत्रिगटाच्या बैठकीतच घेतला जातो. ५ डिसेंबर रोजी मंत्री गटाच्या बैठकीत या प्रस्तावांवर चर्चा करण्यात आली आहे.

सरकारने इथेनॉलबाबतच्या धोरणात बदल केल्यास धान्यावर आधारित इथेनॉल बनवणाऱ्या कंपन्यांना फायदा होईल. ३१ ऑक्टोबर २०२४ पर्यंत इथेनॉलसाठी ३३९ कोटी रुपयांच्या ऑर्डर प्राप्त झाल्या होत्या. ४ डिसेंबर रोजी इथेनॉलचा पुरवठा करण्यासाठी ओएमसीकडून ५७२ कोटींची ऑर्डर मिळाली आहे.

इथेनॉल नेमकं असतं तरी काय?

इथेनॉल हे एक प्रकारचं अल्कोहोल आहे. इथेनॉल हा ऊसापासून तयार करण्यात येणारा एक बायप्रोडक्ट आहे. याची निर्मिती ऊसाचा रस, मका, बटाटा, कंदमुळं आणि खराब झालेल्या भाज्यांपासून केली जाते. स्टार्च आणि साखर यांचं विघटन होऊन तयार झालेलं इथेनॉल पेट्रोलमध्ये मिसळून बायोफ्युअल किंवा फ्लेक्स फ्लुअल म्हणून इंधन वापरलं जातं. इथेनॉल मिसळून तयार करण्यात आलेलं फ्लेक्स फ्लुअल पेट्रोल पंपांवर पाठवलं जातं. फ्लेक्स फ्लुअलने चालणारी वाहनं ही वेगळ्या पद्धतीची असतात. या वाहनांचे इंजिन अशापद्धतीने तयार करण्यात आलेलं असतं की त्यामध्ये फ्लेक्स फ्लुअल वापरल्यास काही अडचण येत नाही.

## उत्तरप्रदेश शासन सरकारी कामकाजातून हटवणार उर्दू आणि फारसी शब्द !

लक्ष्मणपुरी ।प्रतिनिधी

भारतातील धर्मनिरपेक्षतावाद्यांना उत्तरप्रदेशच्या योगी आदित्यनाथ शासनावर ताशेरे ओढण्यासाठी आणखी एक कारण मिळाले आहे. अर्थात् त्यामुळेच या निर्णयाला स्वागतार्ह म्हटले पाहिजे. राज्यातील उपनिबंधकांना यापुढे उर्दूची 'उर्दू इमला' नावाची परीक्षा द्यावी लागणार नाही. याचे कारण असे की, सरकारी कामकाजामध्ये होत असलेल्या उर्दू आणि फारसी शब्दांच्या अतिरेकी वापरावर प्रतिबंध येणार आहे.

आतापर्यंत उपनिबंधकांना राज्यशासनाच्या नोकरीमध्ये कायम होण्यासाठी २ वर्षांचा कालावधी असलेली उर्दूची परीक्षा द्यावी लागत होती; परंतु योगी आदित्यनाथ शासनाने वर्ष १९०८ पासून चालत आलेला ब्रिटिशांनी बनवलेला कायदा रहित करण्याचा निर्णय घेतला आहे. ब्रिटिशांच्या या कायद्याला 'रजिस्ट्रेशन अॅक्ट' म्हटले जाते. या कायद्याच्या अंतर्गत उर्दू आणि फारसी शब्दांना सरकारी कामकाजात पुष्कळ प्रमाणात प्रोत्साहन देण्यात आले होते.

रकबा, बैनामा, रहन, साकिन, खुर्द



अशा प्रकारच्या सर्वसाधारण जनतेलाही कळू शकणार नाहीत, अशा शब्दांचा भडीमार सरकारी कामकाजात केला जात आहे. यांची जागा आता सामान्य हिंदी शब्द घेणार आहेत, असे सरकारी सूत्रांनी सांगितले. लोक सेवा आयोगाची परीक्षा देऊन निवड झालेल्या उपनिबंधकांना उर्दूची परीक्षा देणे अनिवार्य होते; परंतु आता शासनाने घेतलेल्या या निर्णयामुळे ही परीक्षा द्यावी लागणार नाही. या अभ्यासक्रमाच्या अंतर्गत उर्दू लिहिणे, बोलणे, व्याकरण आणि भाषांतर यांसारख्या गोष्टी शिकाव्या लागत होत्या. शासन आता अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून हे सर्व पालटणार आहे.



कीर्तन महोत्सव गुंधा

आज मराठायोद्धा मराठ्यांचे क्रांतिसूर्य मनोज जरांगे पाटील यांच्या समर्थनार्थ बीड तालुक्यातील गुंधा ६ दिवसाचे आमरण उपोषण मागे घेतल्यानंतर गुंधा येथे चालू असलेल्या साखळी उपोषणाचा ३६ वा दिवस चालू असून,उपोषण करते,तरुण युवक विलास भाऊ मोरे यांचे २४ तासाचे उपोषण संपन्न झाले आज उपोषण स्थळी महाराष्टातील सूप्रसिध्द कीर्तनकार भागवताचार्य सोमूर्ती ह. भ.प.रामेश्वर महराज मते यांची कीर्तन सेवा सर्व समाज बांधवांच्या उपस्थिती संपन्न झाली, सुप्रसिध्द मृदुंगचार्य कीर्तनकार गणेश महाराज लोंढे,मुरुदुंगचार्य महेश महाराज लोणकर, भगवान महाराज उबाळे,बाबा महाराज मुळे,बाळासाहेब महाराज माटे,केत्तापा महाराज माटे,अर्जुन महाराज लोणकर,मच्छिंद्र महाराज लोणकर,बाबासाहेब महाराज मते,नारायण अण्णा मते,बबनराव मते,अशोकराव मते,रामभाऊ मते,,किशोर महाराज मते,नवनाथ महाराज मोरे उत्रेश्वर महाराज मोरे,सखाराम महाराज मोरे,आदि,सर्व गुंधा ग्रामस्थ मंडळी, माता भगिनी, मोठ्या संख्येने उपस्थित होते....एक मराठा लाख मराठा.



लिंबागणेश ।प्रतिनिधी

बीड तालुक्यातील मौजे.लिंबागणेश ग्रामपंचायत कार्यालयात आज दि.०८ डिसेंबर शुक्रवार रोजी संत श्री संताजी जगनाडे महाराज यांच्या प्रतिमेचे पुजन करून जयंती साजरी करण्यात आली. सरपंच बालासाहेब जाधव , उपसरपंच बाळकृष्ण थोरात, ग्रामपंचायत सदस्य शेख समीर, अशोक जाधव, कर्मचारी जीवन मुळे, सुखदेव वाणी, शिवाजी रणखांब,रविबापु निर्मळ, बाळासाहेब मुळे, संतोष भोसले, सुरेश निर्मळ ,अशोकराजे वाणी,दादा गायकवाड, राहुल निर्मळ, रामदास गिरे,कृष्णा रणखांब, प्रमोद रणखांब आदी उपस्थित होते.सामाजिक कार्यकर्ते डॉ.गणेश ढवळे यांनी संताजी जगनाडे महाराज यांच्या महतीचा जीवनपट उलगडताना त्यांचे विचार आणि साहित्य हे प्रेरणादायी असुन सामाजिक बांधिलकी आणि एकतेचा संदेश दिला.जगदगुरू संत तुकाराम महाराज यांच्या जीवनकार्याचा मोठा प्रभाव त्यांच्या मनावर होता.तुकाराम महाराजांच्या किर्तनातील प्रमुख १४ टाळक-यांपैकी प्रमुख असणारे संतांची जगनाडे महाराज यांना तुकारामांची गाथा मुखोद्गत असल्याने तुकाराम महाराजांच्या गाथा इंद्रायणी नदीमध्ये बुडवल्यानंतर सुद्धा त्याचे पुन:र्लेखन. जगनाडे महाराजांनी केल्याने आपणास त्याची महती कळत असल्याचे प्रतिपादन केले.कार्यक्रमाचे सुत्रसंचलन शिवाजी रणखांब यांनी केले.

# जिल्हाधिकारी दीपा मुधोळ- मुंडे यांच्या हस्ते प्रा.आशा फड-चाटे यांना 'संगम साहित्य सेवा सन्मान' पुरस्कार प्रदान

## शिक्षण व साहित्य क्षेत्रातील उल्लेखनीय कामगिरीचे कौतुक

पाटोदा ।प्रतिनिधी

अत्यंत सर्वसामान्य परिस्थितीतून प्रचंड जिद्द, चिकाटी व आत्मविश्वासाच्या बळावर शिक्षण व साहित्य क्षेत्रात विशेष योगदान प्रा.आशा फड-चाटे यांनी दिले आहे. या उल्लेखनीय कार्याची दखल घेत राजस्थान येथील संगम अकादमीच्या वतीने देण्यात येणारा यंदाचा संगम साहित्य सेवा सन्मान- २०२३ हा बीडच्या जिल्हाधिकारी दीपा मुधोळ-मुंडे यांच्या हस्ते आज येथे सन्मानपूर्वक प्रदान करण्यात आला.




प्रा.आशा फड-चाटे यांनी उच्च शिक्षणाबरोबरच साहित्य क्षेत्रात विशेषतः स्त्रियांच्या दुःख, वेदना आणि समस्यांना शब्दबद्ध केले आहे. हिंदी भाषेतील 'जोहरा-एक मूल्यांकन' या कादंबरीस राजस्थानच्या विशेष साहित्य मंडळाच्या वतीने सेवा सन्मान पुरस्कार बहाल केला आहे. हा पुरस्कार बीडच्या जिल्हाधिकारी दीपा मुधोळ मुंडे यांनी प्रदान करून हिंदी साहित्यिक प्रा.आशा फड- चाटे यांचे विशेष अभिनंदन आणि कौतुक केले. यावेळी सहाय्यक नियोजन अधिकारी राधाकृष्ण ईघारे, पत्रकार संघाचे प्रदेशाध्यक्ष वसंत मुंडे, पाटोदा नगरपंचायत चे सभापती राजू जाधव, प्रा.बिभिषण चाटे आदी सह वरिष्ठ अधिकारी पदाधिकारी आणि मान्यवर उपस्थित होते.सामाजिक बांधिलकी मानून प्रमाणिक लेखन कर्तव्य करणाऱ्या प्रा.आशा फड यांचे या सन्मानाबद्दल जिल्हाधिकारी दीपा मुधोळ मुंडे,आ.सुरेश आण्णा धस, माजी आमदार भीमराव धोंडे, शिक्षण महर्षी रामकृष्ण बांगर, सामाजिक कार्यकर्त्या तथा सचिव सत्यभामाताई बांगर,माजी आमदार संजय भाऊ दौंड, राजकिशोर पापा मोदी, जि प सदस्य अश्विनीताई जरांगे, नरेंद्र काका कांकरिया, डॉ.लहू मुंडे, डॉ.बी.डी.मुंडे, संतोष मानूरकर, डॉ. नितीन चाटे, उद्योजक उत्तमराव मिसाळ, ओम प्रकाश लववंशी, ह भ प राधाताई सानप महाराज, ड. गोविंद फड, डॉ.बिभीषण फड, डॉ. बाबासाहेब कोकाटे, प्राचार्य डॉ. हरिदास विधाते, डॉ. बळीराम राख, डॉ. मुरलीधर लहाडे, डॉ. अरविंद घोडके, अप्पर पोलीस अधीक्षक लता फड, कृषी विस्तार अधिकारी शकुंतला चाटे, सविताताई वारे, भाग्यश्री सानप, ललिता पवार, डॉ. संजय तांदळे, वनपरिक्षेत्र अधिकारी शितल चाटे, गीतांजली जायभाये, डॉ. मंडलिक, डॉ. पटेल, तलाठी सौ राठोड, प्रा. शितल सोनवणे, डॉ.नारायण चाटे,सीमा घोलप, प्रणिता पवार पाटील, सौ. प्रियांका जाधव, सविता सोनवणे, रामचंद्र तांदळे,संदीप बेद्रे,उत्तम बोडखे, परमेश्वर गीते, अविनाश मुडेगावकर, प्रा. राजकुमार चाटे, रमेश चाटे धनंजय चाटे आदीसह शिक्षण, साहित्य, पत्रकारिता, संस्कृती आदीसह क्षेत्रातील समाज धुरिणांनी अभिनंदन व कौतुक केले आहे.

स्त्रियांच्या वेदनेचा साहित्यातून हुंकार!

सामाजिक बांधिलकी मानून ग्रामीण भागातील विशेषत: महिला व मुलींच्या शिक्षण आणि व्यवस्थेचे प्रश्न आपल्या साहित्यातून मांडून त्यांच्या दुःखाला व्यवस्थेसमोर शब्दबद्ध केले आहे. हे त्यांचे लिखाण परिवर्तनवादी विचाराची नवी तेजस्वी पहाट आहे. या लेखणीचे जिल्हाधिकारी मधोळ- मुंडे यांनी अभिनंदन करून यावेळी विशेष शुभेच्छा दिल्या.

## गेवराई नगर परिषदेतील भ्रष्टाचाराचा विजयसिंह पंडितांनी वाचला पाढा

# कारवाई झाली नाही तर आंदोलन अजून तीव्र करणार -विजयसिंह पंडित




गेवराई/प्रतिनिधी
(दै. महाभारत)

गेवराई नगर परिषदेत झालेल्या कोट्यावधी रुपयांच्या आर्थिक गैरव्यवहार, भ्रष्टाचार व अनियमितता प्रकरणाचा पाढा माजी जिल्हा परिषद अध्यक्ष विजयसिंह पंडित यांनी नगर परिषदेसमोर अंदोलन करुन वाचला. यावेळी ते म्हणाले की, शहरातील जलतरण तलाव आणि नाट्यगृह बांधकामाची मुदत संपलेली असतानाही ते सार्वजनिक वापरासाठी खुले होत नाहीत, परिवहन विभागाच्या जागेवर नगर परिषद बेकायदेशीररित्या करत असलेली विकास कामे यांसह विविध भ्रष्टाचारांच्या मुद्यांबाबत दोषीविरुध्द कारवाई करण्याची मागणी विजयसिंह पंडित यांनी करुन कारवाई झाली नाही तर येणाऱ्या काळित हे आंदोलन अधिक तीव्र केले जाईल असा इशारा त्यांनी दिला. नगर परिषदेच्या समोर केलेल्या आंदोलन ते बोलत होते.

गेवराई शहर राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्यावतीने विजयसिंह पंडित यांच्या नेतृत्वाखाली गुरुवार, दि.७ डिसेंबर रोजी नगर परिषद कार्यालयासमोर धरणे आंदोलन करण्यात आले. यावेळी राष्ट्रवादी काँग्रेसचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.यावेळी बोलताना विजयसिंह पंडित पुढे म्हणाले की, गेवराई नगर परिषद आपल्या बापाची जहागिरी आहे अशा आविर्भावात विद्यमान लोकप्रतिनिधी वागत आहेत. हम करे सो कायदा ते राबवताना दिसत असून आम्ही हे सहन करणार नाही. या तालुक्यातील मायबाप मतदारांनी आपल्याला निवडून दिले याचे भान त्यांना राहिले नाही. त्यांनी जनतेच्या रक्षणकर्ता या भुमिकेत असावे, मात्र ते शहर भक्षकस्थानी असल्याचा सनसनाटी आरोप त्यांनी यावेळी केला.

गेवराई नगर परिषदेतील अनियमिततेचा पाडा वाचताना विजयसिंह पंडित पुढे म्हणाले की, गेवराई शहरातील जलतरण तलाव आणि नाट्यगृहाचे काम कंत्राटदाराने मुदतीत पूर्ण केलेले नाही, वारंवार या कामाला बेकायदेशीररित्या मुदतवाढ दिली गेलेली आहे. कंत्राटदाराला पाठिशी घालणाऱ्या विरुध्द कारवाई करा आणि जलतरण तलाव व नाट्यगृह सार्वजनिक वापरासाठी तात्काळ खुले करा अशी मागणी करुन केवळ निवडणुकीसाठी या कामांचा सार्वजनिक वापर सत्ताधाऱ्यांनी रखडविला असून शहरातील जनतेला त्याच्या रास्त वापरापासून वंचित ठेवल्याचा आरोपही त्यांनी केला. गेवराई शहरातील जुन्या बसस्थानकाची जागा राज्यमार्ग परिवहन महामंडळाची असून या जागेसंदर्भात न्यायालयात वाद सुरु आहे. असे असतानाही नगर परिषदेचे प्रशासक या जागेवर शासकीय निधीतून रस्त्याचे काम कसे करू शकतात ?



# लिंबागणेश ग्रामपंचायत ला धूर फवारणीला मिळेना मुहूर्त..!

१०,००,०० रु खर्चून जुलै महिन्यात खरेदी केली फोगींग मशिन

लिंबागणेश ।हरिओम क्षीरसागर

बीड तालुक्यातील लिंबागणेश हे गाव तालुक्यात प्रसिद्ध असुन ग्रामपंचायत हि गावची प्रत्येक कामे करण्यास तेवढी सक्षम हि आहे. मात्र ग्रामपंचायत मधील पदाधिकारी हे गावातील कुठल्याच बाबींवर लक्ष देत नाहीत. मात्र फक्त नावासाठी त्यांनी पदे भुषवलेली आहेत. कारण नवीन ग्रामपंचायत निवडून येऊन वर्ष झाले तरी आणखीन यांनी कामाला प्रत्यक्ष सुरूवात केली नाही. आणि जे कामे केली ते देखील अर्धवट आहेत. उदा. अंगणवाडीसाठी फिल्टर बसवणे. मात्र यांनी नुसते पैसे उचलण्यासाठी बसवलेले असून तीन महिन्यापासून ते धुळखात पडून आहे. आणि विशेष म्हणजे अंगणवाडी साठी अजुन देखील लाईट उपलब्ध नाही. मग यांनी तीन महिन्यापुर्वी बसवलेले फिल्टर हे लावण्याची गरज नव्हती असा रोष ग्रामस्थांकडून होत आहे. आणि आता ग्रामपंचायतने जुलै महिन्यात १,००,००० लक्ष रु खर्चून फॉगिंग मशिन खरेदी केली मात्र डिसेंबर महिन्यात ती मशिन ग्रामपंचायत कार्यालयात आली. मग इतक्या दिवस मशीन होती कुठे ? असा प्रश्न ग्रामस्थांना पडलेला आहे. आणि ती मशिन येऊन देखील चार ते पाच दिवस झाले तरीही ग्रामपंचायत कार्यालयाला धूर फवारणी साठी मुहूर्त मिळालेला नाही.

# महापुरुषांना जात धर्म नसतो बाबासाहेब हे राष्ट्र घडवणारे महामानव होते - न्यायाधीश एस. बी.गणपा

## परळी न्यायालयात महामानवाला अभिवादन

परळी ।प्रतिनिधी

कोणत्याही महापुरुषाला जात धर्म व पंथ नसतो त्यांचे कार्य हे सार्वजनिक हिताचे व देशाच्या एकात्मतेचे असतात त्यामुळे महामानव डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांचे कार्य व विचार सुद्धा समाजाच्या हिताचे व राष्ट्र घडविणारेच होते असे विचार परळी न्यायालयाचे न्यायाधीश एस. बी. गणपा यांनी व्यक्त केले.

काल दिनांक ६ डिसेंबर रोजी महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या ६७ व्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त परळी न्यायालयात वकील संघाच्या वतीने आयोजित अभिवादन कार्यक्रमात प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते. यावेळी त्यांचेसोबत न्यायाधीश डी.व्ही. गायकवाड व न्यायाधीश डी.आर. बोर्डे यांचीही प्रमुख उपस्थिती लाभली होती.या कार्यक्रमाचे प्रास्ताविक ज्येष्ठ विधीज्ञ ड.संजय रोडे यांनी केले तर यावेळी ड.डी.एल.उजगरे, सरकारी सहाय्यक अभियोकता ड.गिरी, ड.परमेश्वर गीते,ड. संजय दिघोळे यांनी अभिवादन पर आपले विचार मांडले.



यानंतर उपस्थित सर्व न्यायाधीश व वकील बांधवांतर्फे घटनाकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या स्मृतीस अभिवादन करण्यासाठी दोन मिनिट स्तब्धता बाळगून आदरांजली वाहण्यात आली. सदर कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी परळी वकील संघाचे अध्यक्ष ड.पी.सी.गिराम हे होते तर कार्यक्रमाचे सूत्रसंचालन ड.एस. बी.कांबळे यांनी केले तर आभार वकील संघाचे उपाध्यक्ष ड.महारुद्र कराड यांनी मांनले.या कार्यक्रमास परळी न्यायालयातील सर्व न्यायालयीन कर्मचारी व वकील बंधू व भगिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.




# विजया दतात्रय दहिवाळ समाजभूषण पुरस्काराने सन्मानित

परळी / ।प्रतिनिधी

परळीतील स्वातंत्र्यसैनिक, कला योगी, चित्रकार दत्तात्रय दहिवाळ गुरुजी यांची कन्या विजया दहिवाळ यांना कै. उत्तमराव विटेकर माजी आमदार यांच्या ९ व्या स्मृती दिना प्रित्यर्थ माजी आमदार स्वर्गीय उत्तमराव विटेकर (भाऊ ) यांच्या नांवाने समाजभूषण पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. कै.उत्तमराव विटेकर माजी आमदार, यांच्या ९ व्या स्मृती दिना प्रित्यर्थ माजी आमदार स्वर्गीय उत्तमराव विटेकर (भाऊ ) यांच्या नावाने राजेश भैय्या विटेकर दरवर्षी सामाजिक राजकीय क्षेत्रातील नावलौकिक असलेल्या व्यक्तींना हा पुरस्कार देण्यात येतो. यावर्षीच्या पुरस्काराच्या मानकरी परळीच्या विजयाताई दहिवाळ यांना हा मानाचा पुरस्कार देण्यात आला आहे.कै. उत्तमराव विटेकर माजी आमदार, यांच्या ९ व्या स्मृती दिना प्रित्यर्थ माजी आमदार स्वर्गीय उत्तमराव विटेकर (भाऊ ) यांच्या नावाने सामाजिक कार्याबद्दल विजया दहिवाळ यांना समाजभूषण पुरस्कार आमदार डॉ.राहुल पाटील, आमदार रत्नाकर गुट्टे, माजी आमदार मोहन फड ,जि.प.अध्यक्ष राजेश दादा विटेकर यांच्या हस्ते देण्यात आला. विजया ताईंच्या गौरव पूर्ण सामाजिक कार्याबद्दल हा पुरस्कार देण्यात आला असुन या पुरस्कारामुळे विजया ताईंचे सर्व स्तरातून अभिनंदन व पुढील वाटचालीस शुभेच्छा वर्षाव होत आहे.

# जानकीबाई जनार्दन ठाकूर स्कूल आवरे मध्ये आजी-आजोबा दिवस मोठया उत्साहात साजरा



उरण ।प्रतिनिधी

आत्माराम ठाकूर मिशन संचलित जानकीबाई जनार्दन ठाकूर स्कूल आवरे ता. उरण, जि. रायगड या इंग्रजी माध्यमाच्या शाळेत आजी-आजोबा दिवस मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला कार्यक्रमाचे उद्घाटन आजोबा महादेव गावंड यांनी केले. यावेळी कमळाकर गावंड, पार्वती गावंड, अहिल्या पाटील व गजानन म्हात्रे हे आजी-आजोबा उपस्थित होते. यावेळी विद्यार्थ्यांच्या फॅन्सी ड्रेस स्पर्धा घेण्यात आल्या, त्यामध्ये रचित पावस्कर, श्रीयाश पाटील व दिविशा गावंड यांना अनुक्रमे प्रथम, दुद्वितिय, तृतीय क्रमांक मिळाला तसेच आजी-आजोबा याच्या संगीत खुर्ची व बादलीत चेंडू टाकणे या स्पर्धा घेण्यात आल्या, संगीत खुर्ची महीलामध्ये जनाबाई म्हात्रे व काशी पाटील यांनी अनुक्रमे प्रथम, द्वितिय क्रमांक पटकवला तसेच पुरूषांमध्ये शंकर पाटील व विश्वास म्हात्रे यांनी अनुक्रमे प्रथम, द्वितीय क्रमांक पटकवला. तसेच बादलीत चेंडू टाकणे या स्पर्धेत महिलांमध्ये शुभांगी म्हात्रे व जनाबाई म्हात्रे यांनी अनुक्रमे प्रथम, द्वितिय क्रमांक पटकवला. तसेच पुरूषांमध्ये विलास ठाकूर व शंभु गावंड यांनी अनुक्रमे प्रथम, द्वितिय क्रमांक पटकवला. या कार्यक्रमामध्ये शिक्षक-पालक संघाच्या उपाध्यक्षा शुभांगी पाटील व सदस्या मिनाक्षी पावसकर, रसिता म्हात्रे, प्रणाली पाटील, प्रदिप वर्तक, संस्थेचे अध्यक्ष अशोक ठाकूर, मुख्याध्यापिका निकिता म्हात्रे व्यासपिठावर उपस्थित होते. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन शिल्पा भुसारी व स्वराली भोईर यांनी केले. तर आभार प्रर्दशन प्राजक्ता नाईक यांनी केले, कार्यक्रम यशस्वी करण्यास शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी मेहनत घेतली.



ता आष्टी नांदा येथील शेतकरी राधाकृष्ण माणिकराव औटे यांचे तुर या पिकांचे मोठे नुकसान झाले असुन एकही महसुल अधिकारी शेतकऱ्यांच्या बांधावर आलेल्या नसुन शेतकरी यांनी तलाठी यांना प्रश्न विचारता तलाठी यांनी आष्टी तालूका दुष्काळ जाहीर केलेले असे सांगता दुष्काळाची कसलाही जीआर प्रेस नोट दिलेली नाही तरी तात्काळ पंचनामे करा व दुष्काळ जाहीर करा असे आवाहन शेतकरी वर्ग करतात.




# ढगाळ वातावरणाचा परिणाम, धुक्यात हरवल्या वाटा

बीड ।प्रतिनिधी

जिल्ह्यात मागील दोन ते तीन दिवसांपासून ढगाळ वातावरण होत आहे. या वातावरणाचा परिणाम म्हणून आता पहाटेच्या वेळी धुके पडत आहे. सकाळी पडणारे हे धुके पिकांसाठी मात्र फार फायदेशीर नाही. सध्या दाट धुके पडत असल्याने सकाळच्या वेळी रस्ते धुक्यात हरवत आहेत. माजलगाव तालुक्यातील टाकरवण परिसरातील हे दृश्य. छाया : वचिष्ट आठवे, टाकरवण.

# सुंदर भोसले हा मराठा समाजाच्या आरक्षणाचा योद्धा आहे :-रमेश पाटील

वडवणी ।प्रतिनिधी

मराठा समाजाच्या आरक्षणाच्या प्रश्नावर गेल्या एक महिन्यापूर्वी मराठा आरक्षण आंदोलक सुंदर भोसले यांना ऑडिओ क्लिपमुळे अटक करण्यात आली होती यामुळे कुठलाही राजकीय नेता व समाजातील नेता पुढे येऊन या कुटुंबाला भेट देत नव्हता परंतु समाजाच्या सुखदुःखात सहभागी असणारे सामाजिक कार्यकर्ते रमेश पाटील यांनी धारुर तालुक्यातील धुनकवाड येथे सुंदर भोसले यांच्या घरी भेट देऊन त्यांच्या कुटुंबाला धीर देण्याचे काम केले असून यावेळी बोलताना त्यांनी सांगितले की सुंदर भोसले यांच्या पाठीशी मराठा समाज खंबीरपणे उभा असुन सुंदर भोसले हा मराठा समाजाच्या आरक्षणाचा योद्धा असून या कुटुंबाने घाबरून जाऊ नये व घरात बसून सडुन मरण्यापेक्षा लढाई लढुन मरणं चांगलं असं ही सांगितले. यावेळी मराठा क्रांती मोर्चाच्या अॅड. सुवर्णाताई मोहिते पाटील,शिवराज मोहिते पाटील, रमेश शिंदे,अमर बने, अर्जुन मुळे, गणेश चव्हाण,आकाश सावंत, प्रकाश चव्हाण यासह समाज बांधव उपस्थित होता.

गेल्या अनेक दिवसांपासून मराठा समाजाचे आरक्षणासाठी आंदोलने,मोर्चे,उपोषणे करण्यात आले असल्याने गेल्या काही दिवसापूर्वी अंतरवली येथे मराठा आरक्षणाचे योध्दा मनोज जरांगे पाटील यांचे आंदोलन उधळून टाकण्याचा प्रयत्न करुन उपोषणकर्त्यावर अमानुषपणे लाठी हल्ला करून अनेक आंदोलनकर्त्याला जखमी केले यानंतर मराठा समाजाचे आंदोलन मोठ्या प्रमाणात पेटले याच अनुषंगाने धारूर तालुक्यातील धुनकवड येथील मराठा आरक्षण आंदोलक सुंदर भोसले यांनी ऑडिओ क्लिप व्हायरल केल्याने त्यांच्यावरही गंभीर गुन्हा दाखल केला असून त्यांना गेल्या एक



महिन्यापूर्वी अटक केली तरी या मराठा आरक्षण आंदोलकांच्या घरी सामाजिक कार्यकर्ते रमेश पाटील हे संभाजीनगर येथुन येऊन भेट दिली व त्यांच्या कुटुंबाची विचारपूस करुन भयभीत झालेल्या कुटुंबाला धीर दिला.यावेळी धुनकवाड सह पंचक्रोशीतील मराठा समाजाचे कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# केज तालुक्यात शैक्षणिक गुणवत्ता वाढविण्यासाठी प्रयत्न करणार
## गटशिक्षण अधिकारी लक्ष्मण बेडसकर

केज ।प्रतिनिधी

केज तालुक्याचा गट शिक्षणाधिकारी पदाचा पदभार स्वीकारताना प्रसार माध्यमांशी बोलताना श्री.लक्ष्मण बेडसकर म्हणाले की, नांदेड जिल्हा,केजतालुका व माजलगाव तालुक्यात गट शिक्षणाधिकारी पदावर काम करताना अनेक अनुभवांना सामोरे जाऊन त्यात मार्ग काढण्याचे काम मी सतत केले व करीत रहाणार आहे.माझ्या कार्यालया तील सर्व अधिकारी व सुनिल केंद्रे,दत्तात्रय चाटे, सुहास नानजकर आणी सर्व माझे शिक्षक यांना विश्वासात घेऊन काम करणार आहे असेही ते म्हणाले.प्रसार माध्यमांशी बोलताना श्री.लक्ष्मणराव बेडसकर म्हणाले की, शिक्षकांच्या सहकार्याने कार्यालयीन काम करीत राहील.बाकी कार्यालयात चालत असलेल्या काही गोष्टी या विषया पासून



अलिप्त राहून शैक्षणिक विकास केज तालुक्या साठी कसा करता येईल ? यासाठी मी स्वतः वाहन घेऊन वरिष्ठ कार्यालयाने टाकलेला विश्वासास सदैव पात्र राहील.केज तालुक्या तील विविध शिक्षक संघटनांनी कार्यालयात जाऊन पदभार घेतल्या नंतर श्री.लक्ष्मणराव बेडसकर यांचा सत्कार केला.यावेळी राजाभाऊ कदम,अण्णा कसबे, विकास चौरे,नामदेव चौरे, सुभाष चौरे,सय्यद जफार, हनुमंत कटारे,गोकुळ सारूक,सुनील नेहरकर, पांडुरंग जोगदंड,सुहास नानजकर,गणेश ससाने, चंद्रकांत मोरे,सुंदर चौरे, बब्रुवान चौरे,अनंत वायबसे,हनुमंत चौरे, महावीर मोहिते, बालासाहेब तांदळे सह अनेक पदाधिकारी,विवीध शाळेचे मुख्याधापक, शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते.




# मराठा आरक्षणासाठी कायदा करा

हिंगोली /प्रतिनिधी

डिग्रस फाटा शिवारात कुठे टाळ मृदंगाचागजर तर कुठे एक मराठा लाख मराठा'',अस कसं देत नाही घेतल्याशिवाय राहतनाही'' अशा प्रचंड घोषणा देत लाखो मराठा बांधव मनोज जरांगे पाटील यांच्या सभेच्या ठिकाणी गुरुवारी सकाळपासूनच डिग्रसफाटा येथे दाखल झाले होते. सभेला हजर राहण्यासाठी मराठा बांधवांनी भरलेलीवाहने मुख्य मार्गावरून धावत होती.सकाळी अकरा वाजेपर्यंत लाखो बांधवसभेच्या ठिकाणी हजर झाले होते. डिग्रसफाटा (ता.हिंगोली) येथील मनोज जरांगेपाटील यांची सभा ऐतिहासिक करण्यासाठी सकल मराठा समाजातील नागरिक एकवटले होते. मागील पंधरा ते वीसदिवसांपासून सभेच्या ठिकाणी तयारी सुरूहोती. ६ डिसेंबरच्या सकाळपासून ६ हजारस्वयंसेवक सभेच्या ठिकाणी हजर झालेआहेत. मराठा समाजातील नागरिकांचीहोणारी गर्दी लक्षात घेता स्वयंसेवकांनाआवश्यक सूचना दिल्या होत्या. दरम्यान,गुरुवारी सकाळपासून नांदेड, परभणी,हिंगोली, वाशिम, यवतमाळ जिल्ह्यातूनलाखो मराठा बांधव सभेच्या ठिकाणी हजरझाले होते. टाळ-मृदंगाचा गजर तसेचघोषणाबाजीने वातावरणात उत्साह जाणवतहोता. सकाळी औंढा नागनाथ,कळमनुरीकडून येणारे रस्ते नागरिकांनीफुलून गेले होते. दरम्यान, या सभेसाठीमहिलांचीही लक्षणीय उपस्थिती होती. हिंगोली तालुक्यातील डिग्रस फाटा येथे मनोज जरांगे पाटील यांनी उपस्थित लाखो मराठा बांधवांना मार्गदर्शन केले.

# खा.रजनीताई पाटील यांचा वाढदिवस विविध सामाजिक उपक्रमांनी साजरा
## स्वच्छताअभियाननिबंध स्पर्धा,विद्यार्थ्यांना फळे वाटप

केज ।प्रतिनिधी

राज्यसभेच्या खासदार काँग्रेसच्या नेत्या केज माऊली विद्यापीठाच्या संस्थापक खा.रजनीताई अशोकराव पाटील यांच्या वाढदिवसानिमित्त माऊली विद्यापीठ अंतर्गत विविध शाळा,महाविद्यालयात विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे वाटप,खाऊ वाटप अशा विविध सामाजिक उपक्रमांनी वाढदिवस साजरा करण्यात आला.संस्थेचे प्रशासकीय अधिकारी प्रताप मोरे नियोजनातून विविध उपक्रम घेण्यात आले.प्राथमिक माध्यमिक विद्यालय उमरी येथे विद्यार्थ्यांना खाऊचे वाटप करण्यात आले.रामराव पाटील उच्च माध्यमिक विद्यालयातविद्यार्थ्यांसाठी वाचन उपक्रम घेऊन विद्यार्थ्यांना पुस्तके संच भेट देऊन पुस्तक पेढी सुरू करण्यात आली. सरस्वती कन्या प्रशालेत निबंध स्पर्धा व फळे वाटप कार्यक्रम घेण्यात आला. राजीव गांधी माध्यमिक विद्यालयात स्वच्छता मोहीम व विद्यार्थ्यांना खाऊ वाटप,महिला कला



महाविद्यालय मार्फत जिव्हाळा निवारा केंद्र येथे आश्रित व वृद्ध नागरिकांना किराणा साहित्य भेट,माऊली प्राथमिक विद्यालय बीड निबंध स्पर्धा व सुंदर हस्ताक्षर स्पर्धा घेण्यात आल्या.प्रमिला देवीपाटील कला महाविद्यालयाच्या वतीने कळसंबर येथील अनाथ आश्रमात फळे वाटप करण्यात आले.

केज येथील आदर्श प्राथमिक शाळेत विद्यार्थ्यांना खाऊ वाटप करण्यात आला. अनावश्यक खर्च टाळून सामाजिक उपक्रमांनी वाढदिवस साजरा करण्यात आला.मुख्याध्यापक धनराज सोनवणे,डॉ.हनुमंत सौदागर,प्राचार्य विजय शिनगारे,मुख्याध्यापिका सविता घुले,मुख्याध्यापक श्री खोसे,मुख्याध्यापक राम कांबळे,सहशिक्षक विलास भिसे, मुख्याध्यापक संदीप सत्वधर आदींच्या नियोजनातून उपक्रम घेण्यात आले.कार्यक्रमास शिक्षक शिक्षकेत्तर कर्मचारी,विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# धायगुडा पिंपळा गावात गळफास घेऊन युवकाची आत्महत्या

अंबाजोगाई ।प्रतिनिधी

अंबाजोगाई तालुक्यातील धायगुडा पिंपळा गावातील एका २५ वर्षीय युवकाने राहत्या घरात गळफास घेऊन आत्महत्या केली आहे. सूरज भास्कर गोरे असं आत्महत्या केलेल्या युवकाचे नाव आहे. सूरज हा घरात एकुलता एक मुलगा असल्याने त्याच्या निधनाने गावात



हळहळ व्यक्त करण्यात येत आहे.

या बाबत प्राप्त माहिती अशी की, सूरज हा काल रात्री (दि. ६) राहत्या घरातील आपल्या खोलीत झोपण्यासाठी गेला होता. सकाळी घरच्यांनी त्याच्या खोलीत पाहिले असता सूरजने आत्महत्या केल्याचे निदर्शनास आले. सूरजने आत्महत्या का केली ? याचे कारण अद्याप स्पष्ट झाले नाही. या घटनेचा अधिक तपास अंबाजोगाई ग्रामीण पोलीस करित आहेत.




माजलगांव ।प्रतिनिधी

परमपुज्य गुरुमाउली आयुर्वेद महाविद्यालयात भौतिकसुविधांचा जरी थोडाफार अभाव असेला तरी संस्थेने दर्जेदार आणि गुणवंत प्राध्यापकांची उपलब्धता आयुर्वेद महाविद्यालयात केली असुन महाविद्यालयातुन समाजाभिमुख डॉक्टर घडणार असल्याची ग्वाही डॉ. यशवंत राजेभोसले यांनी आयुर्वेद महाविद्यालयाच्या प्रथमवर्ष प्रवेशित झालेल्या विद्याथ्र्यांच्या स्वागत कार्यक्रम प्रसंगी दिली. यावेळी मंचावर मुख्य वक्ते म्हणुन शिवचरित्रकार डॉ. शिवरत्न शेटे, अमित बिंदु, प्राचार्या जयश्री पाटील, डॉ. युवराज कोल्हे, डॉ. विजय खळगे, पत्रकार हरिश यादव आदींची उपस्थिती होती. पुढे बोलतांना डॉ. राजेभोसले यांनी महाविद्यालय जरी नविन असले तरी पालकांनी महाविद्यालयावर विश्वास ठेवुन निवड प्रक्रियेत महाविद्यालयाची निवड केल्या बददल पालकांचे धन्यवाद व्यक्त केले तसेच आपल्या पाल्यांची कसल्याही प्रकारची चिंता पालकांनी करु नये

# केज तालुक्यातील काळेगाव माध्य व उच्च माध्यमिक विद्यालया च्या प्राचार्यपदी राहूल भैय्या गदळे यांची नियुक्ती

केज।प्रतिनिधी

केज तालुक्यातील काळेगाव( घाट) येथील काळेगाव माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालया च्या प्राचार्यपदावर राहुल भैय्या गदळे यांची सर्वानुमते नियुक्ती करण्यात आली आहे.यावेळी शिवकृपा विद्या प्रसारक मंडळ दहिफळवडमाऊली शिक्षण संस्थेचे अध्यक्ष श्री सखाहरी तात्या गदळे यांनी राहुल भैय्या गदळे यांची काळेगाव माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाच्या प्राचार्य पदावर सर्वानुमते निवड केली.तरुण,तडफदार,अत्यंत हुशार मनमिळावू व्यक्तिमत्व असणारे राहुल भैय्या गदळे यांची प्राचार्य पदावर नियुक्ती झाल्यामुळे काळेगाव माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाचे प्राध्यापक, शिक्षक,शिक्षकेत्तर कर्मचारी,विद्यार्थी व विद्यार्थिनींनी राहुल भैय्या गदळे यांना पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या आहेत.राहुल भैय्या गदळे यांची प्राचार्य पदावर नियुक्ती केल्या मुळे परिसरातील मित्र परिवार,पालकांनी राहुल भैय्या गदळे यांचा शाळेत येऊन सत्कार केला व पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. राहुल भैया गदळे यांनी प्राचार्य पदाचा पदभार स्वीकारल्या नंतर आपल्या शाळेमध्ये विविध नाविन्यपुर्ण उपक्रम हाती घेऊन विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास कसा होईल याकडे लक्ष दिले जाईल व आपल्या काळेगाव माध्यमिक उच्च माध्यमिक विद्यालयाचा विद्यार्थी देशातच नव्हे तर जगामध्ये आपल्या शाळेचे नाव कसे उज्वल करू शकतो याकडे लक्ष दिले जाईल, विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास हाच



महत्त्वाचाअसतो.विद्यार्थ्यां मधील सुप्त कलागुणांना वाव देऊन त्यांच्यातील सुप्त गुण बाहेर काढून ते त्याच्या पुढील आयुष्या साठी कसे उपयोगी पडेल याकडे प्रकर्षाने लक्ष दिले जाईल.यापुढे सर्वांनी एकजुटीने अध्यापन कार्य करून विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास करावयाचा आहे.इयत्ता दहावीच्या विद्यार्थ्याकडे जास्तीत जास्त लक्ष देऊन त्यांना येणाऱ्या परीक्षा साठी अभ्यासक्रम पूर्ण करून त्यांच्याकडून जास्त तासिका घेऊन सराव करून घ्यावा असे सर्व शिक्षकांना सूचना केल्या. या बैठकीचे प्रास्ताविक श्री.गायकवाड बी.एम. यांनी केले व अनुमोदन श्री ढाकणे सर यांनी दिले. यावेळी शाळेतील शिक्षक, प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते. राहुल भैय्या गदळे यांच्या प्राचार्य पदावरील नियुक्तीचे सर्व स्तरातुन स्वागत होत आहे.




गेवराई ।प्रतिनिधी

शाळा गेवराई येथील उपक्रमशील शिक्षक विलास पवार यांना राज्यस्तरीय क्रांतीसुर्य महात्मा फुले आदर्श शिक्षक पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले परिवर्तन सामाजिक संस्था महाराष्ट्र राज्य व जगदीशब्द फाउंडेशन पुणे तर्फे ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले सभागृह गंज पेठ पुणे येथे विविध मान्यवरांच्या उपस्थितीत हा पुरस्कार प्रदान करण्यात आला सुप्रसिद्ध अभिनेते किरण माने, समाज कल्याण सहाय्यक आयुक्त विशाल लोंढे, संपादक महाराष्ट्र टाइम्स ऑनलाइन चे अभिजीत कांबळे इतिहास संशोधक डॉ.श्रीमंत कोकाटे, लेखक जगदीश मोहोळ, परिवर्तन सामाजिक संस्थेचे अध्यक्ष महादेव वाघमारे, जगदीशब्द फाउंडेशन पुणे च्या सचिव छाया जायकर आदी मान्यवर उपस्थित होते. तसेच जिल्हा परिषद माध्यमिक शाळा मुलांची गेवराई येथील मुख्याध्यापक राजकुमार पोपळघट, प्रताप कुडके बी.टी.गवळी शाळेतील सर्व शिक्षक वर्ग विलास पवार यांचा सत्कार करून शुभेच्छा दिल्या.


हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक दीपक इंदर थोरात यांनी निर्मिती प्रिंटस्, धोंडीपुरा, टिळक रोड, जोशी नर्सिंग होमसमोर, बीड ता.जि.बीड-४३११२२ येथे छापुन कार्यालय सायं.दैनिक महाराष्ट्र आरंभ, घर नं.१-७-३८१,जुन्या पोलीस अधीक्षक कार्यालयाजवळ, थोरातवाडी बीड-४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक - दीपक इंदर थोरात

THIS NEWSPAPERS IS PRINTED BY OWNER , PRINTER, PUBLISHER DEEPAK INDAR THORAT AT THE NIRMITI PRINTS,TILAK ROAD , DHONDIPURA, IN FRONT OF JOSHI NURSING HOME, BEED, TQ.BEED DIST.BEED-431122 (MH) AND PUBLISHED AT. THE OFFICE OF DAILY EVENING MAHARASHTRA AARAMBH , H.NO.1-7-381, NEAR OLD S.P. OFFICE,THORATWADI, BEED TQ.DIST.BEED -431122 EDITOR - DIPAK INDAR THORAT